म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवाङ्मय
दा. क्र. ४४९५

# नाटकांच्या गोष्टी : ३

# मूकनायक

BVBK-0404495

पु. रा. लेले.

दा. क्र. ४४९५

# नाटकांच्या गोष्टी : ३

# मूकनायक

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या
'मूकनायक' नाटकाची गोष्ट

पुरुषोत्तम रामचंद्र लेले

नों. दि.
दा. क्र. ४४९५ नों. दि.
वि. बा. वा.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य आठ आणे

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

पहिली आवृत्ति : २६ डिसेंबर, १९५३

मुद्रक :
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :
केशव भिकाजी ढवळे,
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

# नांदी

किर्लोस्कर संगीत मंडळीच्या ऐन अमदानींत तिच्या मालकांनीं बक्षीस लावून नाटकें मागविलीं त्यांतून श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांनीं लिहिलेलें 'वीरतनय' नाटक पसंत करण्यांत आलें. ह्या नाटकाच्या नायकाचें नांव शूरसेन. तो एका राजाचा सेनापति होता. ही भूमिका अतिशय तडफदार होती. भाऊराव कोल्हटकर मूळचे स्त्रीपार्ट करणारे पण नंतर त्यांनीं नायकाच्या भूमिका करावयास सुरुवात केली. मृच्छकटिक आणि शापसंभ्रम ह्या नाटकांत अनुक्रमें चारुदत्त आणि पुंडरीक ह्या भूमिका मधुर गायनामुळें आणि नैसर्गिक सौंदर्यामुळें अत्यंत लोकप्रिय झाल्या. पण भाऊरावांच्या आवाजांतील जोरकसपणाचा पुरेपूर उपयोग ह्यांपैकीं कोणत्याही भूमिकेंत होत नव्हता.



भाऊराव कोल्हटकर

शूरसेनाच्या भूमिकेंत ह्या गुणाची जोड आवाजाच्या माधुर्याला मिळाली आणि भाऊरावांची ही भूमिका एकदम चमकून पुढें आली. नायिकेच्या कामापेक्षांही भाऊरावांच्या नायकाच्या भूमिका रसिकांच्या डोळ्यांना व कानांना अधिक तृप्त करूं लागल्या.

'वीरतनय' नाटकानें मुंबईंत वादळासारखा प्रवेश केला. भाऊरावांचा जोरकस आवाज आणि नाटकांतील चालींचें नावीन्य ह्या जोडगोळीची लज्जत मुंबईकरांना चाखावयास मिळाली. नाटकाला उत्पन्न चांगलें झालें. कोणीं स्तुति केली, कोणीं नांवें ठेवलीं, पण 'वीरतनय' नाटक गाजलें आणि त्यानेंच कोल्हटकरांना नाटककाराचा दर्जा मिळाला.

त्यानंतर पांच वर्षांनीं त्यांचें 'मूकनायक' नाटक रंगभूमीवर आलें. दरम्यान भाऊराव दिवंगत झाले आणि त्यांची जागा नारायण दत्तात्रेय ऊर्फ



नानासाहेब जोगळेकर



बालगंधर्व

नानासाहेब जोगळेकर ह्यांनीं घेतली. पहिल्या प्रयोगापासूनच विक्रांताची म्हणजे नायकाची भूमिका जोगळकरांनीं केली. नायिकेची भूमिका १९०६ पासून बालगंधर्वांनें केली.

'मूकनायक' हें कविकल्पनेचें एक उत्तुंग उड्डाण आहे. अद्भुतरम्य नाटकाचा हा अप्रतिम नमुना आहे. ह्यांत काव्य आणि संगीत खचून भरलेलें आहे. शिवाय ह्यांतील विनोद आणि शाब्दिक कोटिक्रम इतका अभिनव, सहज आणि मोहक ठरला कीं त्यामुळें नाट्यलेखनांत व प्रेक्षकांच्या अभिरुचींत फार मोठी क्रांति घडून आली. अत्यंत प्रसिद्ध नाटककार कै. राम गणेश गडकरी ह्यांचें 'कोल्हटकरांच्या नाटकांतील सुंदर उतारे' हें पुस्तक १९०७ सालीं प्रसिद्ध झालें. मूकनायकांतील पदांसंबंधीं गडकऱ्यांनीं असें लिहिलें आहे कीं 'मूकनायकांतून निदान साठांपेक्षां अधिक पदें घ्यावीं लागतील, परंतु तसें करण्यास येथें अवकाश नाहीं.' ह्या नाटकांतील उताऱ्यांच्या अखेरीस, हें सबंध नाटक रसिकांनीं लक्षपूर्वक एकदा तरी मुद्दाम वाचून पाहावें.' अशी गडकऱ्यांनीं शिफारस केली आहे.



रा. ग. गडकरी

मूकनायक नाटकांत मद्यपानाचे दुष्परिणाम दाखवले आहेत हें जरी खरें असलें तरी त्याकारणें कोल्हटकरांनीं रंगभूमीचें प्राचारिक व्यासपीठ बनवलें नाहीं. मदिरासक्त शरच्चंद्र राजाच्या अभिजात उच्च संस्कृतीला व रसिकतेला त्यांनीं धक्का दिला नाहीं, रंगभूमीला प्रचाराची दासी किंवा दिंडीचा चवुतरा बनविलें नाहीं.

'मूकनायक' नाटक रंगभूमीवर आल्यापासून 'मानापमान' रंगभूमीवर यईपर्यंत संगीत मराठी रंगभूमीवर कोल्हटकरांचें स्थान अविवाद्यपणें अग्रेसर होतें. ह्याचा अर्थ त्यांच्या नाटकांवर



कृ. प्र. खाडिलकर

प्रतिकूल टीका होत नव्हती असा नव्हे. पण सौभद्र आणि मृच्छकटिक किंवा शारदा ह्यांच्या जोडीनें ' मूकनायक ' नाटकाचे प्रयोग करण्यासाठीं नाटक कंपन्या धडपडत असत. तसेंच नवें नाटक मागण्यासाठीं कोल्हटकरांकडे बहुतेक कंपन्या खेटे घालीत असत.

सन १९१० सालीं बडोदें शहरीं मराठी साहित्यसंमेलन भरलें त्या प्रसंगीं कै. रोमेशचंद्र दत्त ह्यांच्याशीं कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्यांनीं कोल्हटकरांची ' foremost marathi playwright ' ( अग्रेसर मराठी नाटककार ) ह्या शब्दांनीं ओळख करून दिली.

कोल्हटकर एका संप्रदायाचे जनक होते. त्यांच्या संप्रदायाचे पहिले आणि अत्यंत प्रभावी शिष्य कै. राम गणेश गडकरी होत. गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासांतील अर्पणपत्रिका आणि भावबंधनाच्या नांदींतील पदांमधील ' वंदुनियां श्रीपादपदांप्रति ' हा चरण वाचल्यास त्यांच्या शिष्यत्वाचा पुरावा आजच्या पिढीस सापडेल. सावनेर मुक्कामीं गडकरी आसन्नमरण अवस्थेंत असतांना भ्रमांत बडबडत त्या भ्रमांतसुद्धा ' तात्यांनीं मला लिहायला शिकवलं ' असं म्हणत. ' तात्या ती तलवार एक तुमची बाकी विळे कोयते । ' अशी कविता कोल्हटकरांना उद्देशून गडकऱ्यांनीं केली होती.



रोमेशचंद्र दत्त

माधवराव जोशी व मामा वरेरकर हे लोकप्रिय नाटककार, खांडेकर व माडखोलकर हे दोन लोकप्रिय कादंबरीकार, गायन वादन नाट्य व नाट्यलेखन ह्या चारही क्षेत्रांत नांव कमावलेले गोविंदराव टेंबे, हे पांच स्वतःला अभिमानानें कोल्हटकरांचे शिष्य म्हणवणारे साहित्यसेवक आहेत. कोल्हटकर हे नाटककारांचे नाटककार होते. त्यांच्या संप्रदायाची तिसरी पिढी आज चालू आहे.

पु. रा. लेले

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर



किर्लोस्कर आणि देवल ह्यांच्या मागोमाग संगीत रंगभूमीवर अधिराज्य उपभोगणारा नाटककार म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. ह्यांचें पहिलें नाटक 'वीरतनय' देवलांच्या 'शारदा' नाटकाच्या अगोदर रंगभूमीवर आलें आणि तें भाऊराव कोल्हटकरांनीं हौसेनें मराठी रंगभूमीवर आणलें. 'मूकनायक' हें त्यांचें दुसरें नाटक. सन १८९६ पासून १९२८ पर्यंत ज्यांचें स्थान नाटककारांमध्यें अग्रगण्य मानलें जात असे त्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा जन्म वऱ्हाडांत ता. २९ जून १८७१ रोजीं झाला. त्यांचें उच्च शिक्षण मुंबई-पुण्यांत झालें. मुंबई विद्यापीठाच्या 'बी. ए.' आणि 'एल्एल्. बी.' ह्या दोन पदव्या त्यांनीं मिळवल्या. त्यांचा धंदा वकिलीचा होता, पण ते हाडापिंडाचे सौंदर्योपासक होते. ह्या दृष्टीनेंच 'मूकनायक' ही त्यांची उत्कृष्ट कलाकृति मानली जाई आणि मराठी रंगभूमीच्या वैभवाच्या दिवसांत सात आठ कंपन्या 'मूकनायक' नाटकाचे प्रयोग करीत.

पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत शिकत असतांना संस्कृत 'मृच्छकटिक' नाटकाच्या प्रयोगांत त्यांनीं शकाराच्या विटाची भूमिका केली होती. कॉलेजांत अभ्यास करीत असतांना नाटक लिहिण्याकडे त्यांची प्रवृत्ति वळली आणि एक नाटकही त्यांनीं लिहिलें; पण तें नाटक कधींही प्रसिद्धीस आलें नाहीं. वयाच्या एकविसाव्या वर्षीं ते 'बी. ए.' झाले आणि एल्एल्. बी.चा अभ्यास करण्याकरतां मुंबईंत राहिले. अभ्यास करीत असतांनाच त्यांनीं 'वीरतनय' नाटक लिहिलें. किर्लोस्कर कंपनीला तें उत्कृष्ट नाटक वाटलें आणि १८९६ च्या मे महिन्यांत त्याचा पहिला

प्रयोग झाला. नंतर सेप्टेंबर महिन्यांत किर्लोस्कर संगीत मंडळी मुंबई शहरीं आली आणि ' वीरतनय 'चे प्रयोग धूमधडाक्यानें करूं लागली.

कोल्हटकर कल्पक कवि होते आणि त्यांची जन्मजात वृत्ति विनोदगर्भ होती. त्यांच्या नाट्यकृतींमध्यें ह्या दोहोंचाही परिपाक सापडतो. शिवाय ते कलात्मक संगीताचे दर्दी व नवीनतेचे पाईक होते. ' वीरतनय ' नाटकांत त्यांनीं धडाडीनें नव्या चाली आणून क्रांति केली. थोडासा अनुभव मिळवल्यानंतर ' मूकनायक ' साठीं अशा कांहीं रंगदार व हृदयंगम चाली त्यांनीं जमा केल्या कीं भाऊराव कोल्हटकरांसारख्या दिव्य आवाजाच्या नाट्यसंगीतसम्राटाच्या मृत्यूनंतर, त्यांचे आलाप लोकांच्या कानांत घुमत असतांना ' मूकनायक ' नाटकांतील अभिनव चालींचें संगीत अत्यंत लोकप्रिय झालें.

' मूकनायक ' नंतर कोल्हाटकरांनीं ' गुप्तमंजूष ' नाटक लिहिलें. हीं दोनही कालाच्या थोड्या फरकानें किर्लोस्कर मंडळीनें रंगभूमीवर आणलीं. कोल्हटकर अद्भुतरम्यत्वाचे उपासक होते. त्यांना वास्तवांतील सौंदर्य दिसत नव्हतें असें नव्हे, पण तें मांडतांना जसेंच्या तसें न मांडतां त्यावर आपल्या कल्पनाविलासाच्या तेजाचा मुलामा देऊन त्यांनीं तें सौंदर्य डोळे दिपवून टाकील इतकें चमकदार केलें. वास्तवांतील प्रत्येक गोष्टीला कलात्मकता देण्याची त्यांची उपजत प्रवृत्ति होती. कविकल्पनेच्या उंच भराऱ्या, सौंदर्यदृष्टि व हृदयंगम कोटिक्रम हे जे कोल्हटकरांच्या लेखनाचे विशेष गुण त्यांचें प्रत्यंतर ' मूकनायक ' नाटकांत प्रकर्षानें आढळून येतें. वास्तवांतील बऱ्यावाईट गोष्टींची सौंदर्यशाली प्रतिकृति म्हणजे नाटक ही दृष्टि ठेवून त्यांनीं नाटकें लिहिलीं. ध्येयवादी सौंदर्योपासक असल्यामुळें कोल्हटकरांनीं काय आहे हें सांगण्यापेक्षां ' कसें असावें ' हें सांगितलें. सर्वांच्या भाषणांमध्यें संस्कृतीचें दर्शन व्हावें हा त्यांचा बाणा ' मूकनायक ' नाटकांत ठळकपणें प्रकट होतो. मूकनायकांतील संवाद

ऐकतांना असें वाटे कीं सर्वांनाच अशी सुंदर अभिजात भाषा बोलतां येईल तर काय बहार होईल !

सन १९०७ सालीं 'मतिविकार' आणि १९१० सालीं 'प्रेमशोधन' हीं नाटकें किर्लोस्कर मंडळीनेंच केलीं. ह्यानंतर दोन वर्षांनीं कोल्हटकरांनीं पहिलें गद्य नाटक 'वधूपरीक्षा' हें लिहिलें आणि त्याचे प्रयोग कै. आप्पा टिपणिसांच्या भारत नाटक मंडळीनें १९१३ सालीं मुंबई शहरीं केले. १९२८ सालीं ह्यालाच कोल्हटकरांनीं संगीत स्वरूप दिलें.

'वधूपरीक्षा' नाटकानंतर 'सहचारिणी' व 'जन्मरहस्य' अनुक्रमें गंधर्व नाटक मंडळी व बलवंत संगीत मंडळी ह्यांच्या रंगभूमीवर आलीं. त्यानंतर कोल्हटकरांनीं 'परिवर्तन', 'श्रमसाफल्य', 'मायाविवाह', 'शिवपावित्र्य' हीं नाटकें लिहिलीं पण कोणत्याही धंदेवाईक कंपनीनें त्यांचे प्रयोग केल्याचें ऐकिवांत नाहीं. ह्या सर्व नाटकांत काल्पनिक वातावरण, कथानक व भूमिका निर्माण करण्यावांचून त्यांचें समाधान होत नसे हें प्रत्ययास येतें. सामान्य जनतेला आपल्यापेक्षां वरिष्ठ वर्गांतील स्त्रीपुरुषांच्या चालीरीती, भाषा, पेहेराव, इत्यादिविषयीं कुतूहल असतें आणि त्यांचें अनुकरण करावें अशी वासना होते ही जाणीव बाळगून कोल्हटकरांनीं ह्या सर्व नाटकांत अशा भूमिका निर्माण केल्या कीं त्या सोज्वळ व हृदयंगम तर असाव्याच, शिवाय त्यांनीं अभिजात व उच्च संस्कृतीचें वातावरण पसरावें.

कोल्हटकरांनीं नाटकांशिवाय अन्य लिखाण मुबलक केलें. ज्योतिर्गणिताचा त्यांचा अभ्यास इतका खोल आणि दीर्घ होता कीं लोकमान्य टिळक ज्या ज्योतिषविषयक संमेलनाला हजर होते अशा एका संमेलनाचे अध्यक्ष कोल्हटकर होते. त्यांचा 'भारतीय ज्योतिर्गणित' हा प्रबंध प्रसिद्ध आहे.

'दुटप्पी कीं दुहेरी' आणि 'शामसुंदर' ह्या त्यांच्या दोन कादंबऱ्या. ह्याशिवाय लहान लहान गोष्टी तर त्यांनीं पुष्कळच लिहिल्या आहेत.

'बिचारें पाडस' ही गोष्ट विशेष नांव घेण्यासारखी असून त्यांत भावनाशीलता प्रतीत होते. गडकरी ह्या गोष्टीवर फिदा झालेले होते.

कोल्हटकरांनीं लिहिण्यास सुरुवात केली, ती एका नाटकावरील टीकालेखानें केली — (कॉलेजांतील लिखाण ह्या ठिकाणीं जमेस धरलेलें नाहीं). त्या नाटकाचें साहित्याच्या दृष्टीनें आज कांहींच महत्त्व नाहीं पण त्या टीकेचें मात्र साहित्याच्या क्षेत्रांत स्थान अढळ आहे.

कोल्हटकरांच्या विविध लेखांचा एक मोठा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्याला कै. नरसिंह चिंतामण केळकरांनीं प्रस्तावना लिहिली आहे. कोल्हटकरांनीं कविता केल्या असून 'गीतोपायन' ह्या नांवानें त्यांच्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. 'महाराष्ट्रगीत' हें कोल्हटकरांनींच केलें. कोल्हटकरांचीं साहित्यविषयक भाषणें अनेक झालीं व तीं प्रसिद्ध झालीं आहेत.

मराठी रंगभूमीवर आणि मराठी साहित्यांत कोल्हटकरांनीं विनोदाला मानाचें आणि महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. उदयोन्मुख प्रतिभासंपन्न नाटककारांना व लेखकांना, प्रेक्षकांना व वाचकांना विनोदावांचून नाटक व साहित्य अळणी वाटूं लागलें. विनोदाचें स्वतंत्र दालन मराठी साहित्य क्षेत्रांत उघडण्याचें कार्य त्यांनींच केलें. त्यांच्या विनोदी लेखांचा संग्रह 'साहित्यबत्तिशी किंवा सुदाम्याचे पोहे' ह्या नांवानें प्रकाशित झाला आहे. कोल्हटकरांना 'तात्यासाहेब' म्हणत.

असा हा चतुरस्र व साहसी लेखक आणि मराठी रंगभूमीला हसती-खेळती करणारा नाटककार पुणें मुक्कामीं ता. १ जून १९३४ रोजीं इहलोक सोडून गेला. ज्या शहरीं त्यांनीं उच्च शिक्षण घेतलें त्या शहरींच आपला देह ठेवला इतकेंच नव्हे तर ज्या जून महिन्यांत त्यांचा जन्म झाला त्याच जून महिन्यांत त्यांचा मृत्यु घडला.

## मूकनायक नाटकांतील पात्रें

विक्रांत : उत्तर हिंदुस्थानांतील सार्वभौम राजा.

वीणारव : म्हणजेच विक्रांत.

शरच्चंद्र : विक्रांताचा प्रमुख मांडलिक.

केयूर : विक्रांताचा दुसरा मांडलिक.

मयूर : म्हणजेच केयूर.

विकंठ : शरच्चंद्राचा खुषमस्कऱ्या दिवाण.

प्रतोद : विक्रांताचा मित्र.

विनोद : म्हणजेच प्रतोद.

यशोधन : शरच्चंद्राचा एक वेळचा दिवाण.

सरोजिनी : शरच्चंद्राची बहीण.

रोहिणी : शरच्चंद्राची पत्नी व विक्रांताची मामेबहीण.

वेत्रिका : यशोधनाची मुलगी.

प्रमद्वरा : यशोधनाची पत्नी.

मुकुलिका : रोहिणीची दासी.

कुमार : शरच्चंद्राचा धाकटा भाऊ.



## मनिं खेद न करिं भगिनी

हिंदुस्थानवर शिकंदराची स्वारी होऊन गेल्यानंतर थोड्याच दिवसांत आपल्या देशांतील राजांनीं पुन्हा आपलें साम्राज्य स्थापन केलें. अशांपैकीं एका सम्राटाचा विक्रांत नांवाचा एकुलता एक मुलगा होता, तो प्रतोद नांवाच्या गरीब मित्रासह गुरुगृहीं विद्या शिकत होता. शिक्षण पुरें होत आलें इतक्यांत त्याचा पिता मृत्यु पावला. पित्याच्या मृत्यूनंतर लगेच त्यानें आपल्या राजधानीस जाऊन राज्याचीं सूत्रें आपल्या हातीं घ्यावयास पाहिजे होतीं. पण त्यानें तसें केलें नाहीं. त्यानें आपल्या राज्याचा कारभार पूर्वीच्या विश्वासू मंत्र्यांच्या हातांतच ठेवला आणि इमानेइतबारें ते कारभार चालवीत होते. विक्रांताची रोहिणी नांवाची मामेबहीण होती, तिचें लग्न शरच्चंद्र नांवाच्या राजाशीं झालें होतें. हा शरच्चंद्र विक्रांताच्या मांडलिकांमध्यें सर्वांत बलिष्ठ होता.

शरच्चंद्राला सरोजिनी नांवाची एकुलती एक बहीण होती. ती अत्यंत रूपवती व गुणवती होती. तिच्या सौंदर्याची ख्याति विक्रांताच्या कानांवर गेली होती आणि तिची आपणास प्राप्ति व्हावी अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. त्याला उघडपणें मागणी घालतां आली असती व त्या मागणीचा स्वीकार होण्याचा

पुष्कळच संभव होता, किंवा खात्री होती म्हटलें तरी चालेल. पण अशा प्रकारें झालेला विवाह विक्रांताला श्रेयस्कर वाटला नाहीं. न जाणो, तिच्या मनांत नसूनसुद्धा केवळ भावाच्या शब्दाखातर किंवा सम्राटाच्या वैभवाला भुलून ती विक्रांताशीं लग्न करायला तयार झाली कीं काय अशी शंका घ्यावयास नेहमींच जागा राहिली असती व असली शंका जीवन उदास करूं शकली असती. म्हणून साध्या वेषांत शरच्चंद्राच्या राज्यांत जाऊन सरोजिनीला पाहावें आणि तिच्या स्वतःच्या पसंतीला उतरल्यासच तिच्याशीं लग्न करावें अशा उद्देशानें विक्रांत प्रतोदासह शरच्चंद्राच्या राजधानीकडे वळला.

केवळ योगायोगानें त्याचें शरच्चंद्राच्या राजधानींत येणें अत्यंत अनुकूल परिस्थितींत झालें. शरच्चंद्राला विकंठ नांवाच्या खुषमस्कऱ्यानें मद्यपानासाठीं दूर नेलें होतें. आपल्या व्यसनाची कोणालाही दाद लागूं नये म्हणून कोणाही रक्षकाला त्यानें आपल्याबरोबर नेलें नव्हतें. शरच्चंद्राच्या शेजारींच केयूर नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याचें राज्य लहान होतें. शरच्चंद्राचें राज्य घशांत टाकण्याचें त्याचें कारस्थान होतें. त्यानें शरच्चंद्राच्या हालचालींवर देखरेख ठेवून शरच्चंद्र व विकंठ हे दोघेच मद्यपान करीत असलेले पाहून त्यांच्यावर निवडक शिपायांसह हल्ला केला. त्यांना शरच्चंद्राला पकडण्यांत यश आलें असतें, पण विक्रांत व प्रतोद त्याच वेळीं त्या ठिकाणीं अचानक आले आणि त्यांनीं केयूराला व त्याच्या शिपायांना पिटाळून लावलें.

आपल्यावर संकट आलें आणि त्यांतून आपली सुटका अगदीं अनोळखी अशा दोन पुरुषांनीं केली हें शरच्चंद्रानें पाहिलें तेव्हां त्यानें दोघांपैकीं अधिक भव्य असलेल्या विक्रांताला नांव विचारलें.




विक्रांत आणि प्रतोद ह्यांनीं केयूराला व त्याच्या शिपायांना पिटाळून लावलें.

आपलें नांव तर विक्रांताला एवढ्यांत जाहीर करावयाचें नव्हतें इतकेंच नव्हे, तर त्यानें आपलें खरें नांव सांगितलें असतें तर शरच्चंद्राला तें खरेंही वाटलें नसतें. कारण, विक्रांत हा त्याचा नवा सम्राट होता. त्याला अशा साध्या वेषांत फक्त एक सोबती बरोबर घेऊन येण्याचें कांहीं सयुक्तिक कारण दाखवतां आलें नसतें. विक्रांत गप्प बसलेला पाहून शरच्चंद्राच्या बरोबर असलेल्या विकंठानें 'तूं मुका आहेस का?' असा प्रश्न खुणा करून विचारला. एक प्रकारें आपली बिकट अडचणींतून सुटका झाली अशा भावनेनें विक्रांतानें चटकन मान डोलावली.

अगोदर कोणतीही योजना न करतां घडलेल्या ह्या गोष्टींचा परिणाम असा झाला कीं आपले प्राण वांचवणारे म्हणून विक्रांत व प्रतोद ह्या दोघांना शरच्चंद्रानें आपल्याबरोबर मानमरातबानें राजवाड्यांत नेलें.

केयूराचा एक डाव हुकला म्हणून त्यानें आपला प्रयत्न सोडून दिला नाहीं. त्यानें बहिरेपणाचें सोंग घेऊन राजाजवळ नोकरीची याचना केली आणि शरच्चंद्रानें एकाच दिवशीं बहिरा व मुका असे दोघे नोकर आपल्याजवळ ठेवले. केयूराचें बहिरेपण खोटें असल्याची शंका विक्रांताला प्रथमपासूनच आली आणि प्रतोदाजवळ त्यानें ती बोलूनही दाखवली.

विक्रांताचें नांव 'वीणारव' असल्याचें प्रतोदानें सांगितलें; कारण विक्रांत स्वतः बोलावयाचा बंद झाला होता. वीणारवाचा मित्र म्हणून प्रतोदाला हेराचें काम देण्यांत आलें. त्यानें 'विनोद' हें नांव घेतलें. केयूरानेंही आपलें नांव बदलून 'मयूर' हें नांव धारण केलें. त्याचें सोंग विक्रांतापेक्षां पुष्कळ सोयीचें होतें, कारण हवें

तेव्हां बोलावयास तो मोकळा होता आणि असंबद्ध असें कांहीं बोलला तरी त्याच्या बहिरेपणामुळें तें खपून जाई.

राजवाड्यांत विक्रांताचा प्रवेश झाल्यानंतर त्याला सरोजिनीची अवचित गांठ घ्यावयाची होती. विक्रांताची मामेबहीण रोहिणी राजवाड्यांतील राणीच होती. तिच्यापासून विक्रांताला आपलें खरें स्वरूप व नांव लपवणें शक्य नव्हतें. तिची भेट झाल्यावर सरोजिनीची अवचित गांठ घेणें हें कठीण नव्हतें. पण रोहिणीच्या पहिल्या भेटीच्या वेळीं दुसरीं माणसें हजर असल्यास त्यांना आपलें खरें स्वरूप समजेल ही भीति त्याला वाटत होती. आपल्या पतीचा प्राणदाता आपल्या नजरेस पडावा अशी उत्कंठा रोहिणीला लागणें अगदीं साहजिक होतें. तिनें आपली इच्छा बोलून दाखवतांच शरच्चंद्रानें त्याला रोहिणीकडे पाठवून दिलें.

रोहिणीनें विक्रांतास पाहताक्षणींच ओळखलें, त्या वेळीं मुकुलिका नांवाची एकच दासी त्या ठिकाणीं हजर होती. ती आपल्या पूर्ण विश्वासांतील असल्याचें आश्वासन रोहिणीनें दिलें तरीसुद्धा त्या दासीला दुसऱ्या महालांत जावयास सांगितलें.

रोहिणी : बाबा जाऊन आज सहा महिने झाले तरी तूं आपल्या राजधानीला गेला नाहींस हें काय?

विक्रांत : कांहीं हेतु मनांत धरूनच मी माझ्या राजधानींत जायच्या आधीं तुझ्या नगरींत आलों आहें. अशा ह्या साध्या प्रवासी वेषांत माझा राजवाड्यांत प्रवेश कसा झाला हें तुला समजलंच असेल.

रोहिणी : तूं त्यांना केवढ्या संकटांतून सोडवलंस हें मला त्यांच्या तोंडूनच ऐकायला मिळालं. मदिरेनें त्यांना ग्रासलं हें केवढं माझं दुर्भाग्य! आतां ह्या संकटांतून माझी सुटका कशी होईल रे ?

विक्रांत : मनिं खेद न करिं भगिनी । हें वच मानीं । कष्टि बघुनि
तुज जाइं श्रमुनि ॥ ध्रु० ॥ प्रयत्न करणें मनुजाहातीं ।
सिद्धि असे ईशेच्छेवरतीं । दूरी होइल चिंता अंतीं ।
धीर धरीं प्रभु आठवोनि मनिं ॥ १ ॥

रोहिणी : तुझ्या तोंडांत साखर पडो. बरं पण विक्रांता, हा वेष तूं केव्हां टाकणार? हा शोभतो तरी का तुला?

विक्रांत : कांहीं दिवस ह्या वेषांतच राहायचं मीं योजलं आहे आणि माझा उद्देश तुला कळला ...

रोहिणी : समजलं. सरळ सांग कीं स्वतःला शोभेशी स्त्री पाहाण्याकरतां तूं आला आहेस म्हणून. विक्रांता, अगोदर दुसरीकडे कुठें गेला नाहींस हें फार चांगलं केलंस.

विक्रांत : तें कसं काय?

रोहिणी : आमच्या वन्सं आहेत कीं नाहीं, त्या अगदीं तुझ्या योग्य आहेत. तुझ्या सारख्याच त्या विनयशील आहेत आणि अतिशय सुंदर आहेत.

विक्रांत : आपलीं माणसं आपणाला सुंदरच वाटतात.

रोहिणी : मीं सांगितलं त्यांतलं एक अक्षर त्यांच्या वैऱ्यालासुद्धा बदलतां येणार नाहीं.

विक्रांत : तिचं एकवार दर्शन होईल का?

रोहिणी : त्यांत काय कठीण? तुझी नि वन्संची गांठ पडेल असा योग मी सहज जुळवून आणीन. तूं जा आतां. वन्संच्या नि तुझ्या भेटीची वेळ मुकुलिकेच्या हातीं तुला कळवीन.

रोहिणीच्या महालांतून विक्रांत निघाला तो आपल्या मित्राला, प्रतोदाला, भेटावयास गेला. यशोधन हा शरच्चंद्राचा मुख्य प्रधान होता, त्याची वेत्रिका नांवाची मुलगी होती. सरोजिनी व वेत्रिका बाळपणापासून मैत्रिणी होत्या. विकंठाच्या कारस्थानाला बळी पडून शरच्चंद्रानें जरी यशोधनाला अधिकारावरून दूर केलें तरी वेत्रिकेला किंवा तिच्या आईला राजवाड्यांत यावयास मज्जाव

झाला नव्हता. वेत्रिकेशीं सरोजिनी पूर्वींइतक्याच प्रेमानें वागे आणि राणी रोहिणी वेत्रिकेच्या आईशीं पूर्वींइतक्याच आदरानें वागे.

प्रतोदाची लहानपणीं वेत्रिकेशीं मैत्री होती. पण प्रतोद गरीब असल्यामुळें यशोधनाला ती मैत्री आवडली नाहीं. त्यानें आपली इतराजी प्रतोदाजवळ बोलून दाखविली. प्रतोदाच्या मानी मनाला सात्त्विक संताप आला व त्यानें तें नगर सोडलें. पुढें त्याच्या सुदैवानें राजपुत्र विक्रांताशीं त्याचा संबंध आला आणि त्या दोघांची मैत्री जुळली. आपल्या लहानपणच्या नगरांत प्रतोद परत आला त्या वेळीं त्याला लहानपणच्या सगळ्या आठवणी होऊं लागल्या. वेत्रिकेची तर त्याला आठवण झालीच. ती अजून अविवाहित असेल कीं विवाहित होऊन दोन तीन गोजिरवाण्या बालकांची आई झाली असेल ह्याबद्दल विचार करण्यांत तो मग्न असतां विक्रांत त्या ठिकाणीं आला.

**विक्रांत** : का प्रतोदा, आकाशाला आशीर्वाद देत होतास वाटतं ?

**प्रतोद** : होय, त्यानें नेहमीं निरभ्र राहावं म्हणून. पण आपलं मुख्य काम कुठपर्यंत आलं आहे ?

**विक्रांत** : नुक्ती सुरुवात झाली आहे. आजच आमची गांठ पडायची आहे.

**प्रतोद** : बरं, आपल्या ह्या सर्व प्रयत्नाला जें बक्षीस मिळायचं आहे तें तरी मनाजोगं आहे का ?

**विक्रांत** : सरोजिनीची जी कीर्ति मीं ऐकली आहे ती वस्तुस्थितीपुढें कांहींच नाहीं.

**प्रतोद** : एकूण आज आपणाला त्रैलोक्यसुंदरी पाहायला मिळणार. पण थांबा, हे दोन गृहस्थ मोठ्या लगबगीनें इकडेच येताहेत. जर का आपणांला बोलतांना त्यांनीं ऐकलं तर लागलीच बभ्रा होऊन मुका बोलतो कसा हें पाहाण्याकरतां इथें गर्दी उसळून जायची.

ते दोघे गृहस्थ त्या ठिकाणीं येऊन पोचले.

**एक गृहस्थ :** आज महाराजांना ज्यांनीं वांचवलं ते आपणच का ?

**प्रतोद :** होय, तेच आम्ही.

**दुसरा गृहस्थ :** हे आपले मुके मित्र असणार. ह्यांचं नांव कृपा करून सांगाल का ?

**प्रतोद :** ह्यांचं नांव वीणारव.

**दुसरा गृहस्थ :** वीणारवमहाराज, आपणांला आणि आपल्या स्नेह्यांना महाराजांनीं उद्यांच्या खासगी दरबारला बोलावलं आहे. आयत्या वेळीं वर्दी द्यायला आम्ही येऊंच. येतों तर आम्ही आतां.

ते दोघे गृहस्थ आल्या वाटेनें गेल्यानंतर विक्रांत व प्रतोद ह्यांनीं कांहीं गुप्त मसलत केली आणि नंतर ते दोघे निरनिराळ्या मार्गांनीं गेले. विक्रांताला सरोजिनीशीं एकान्तांत बोलण्याची तयारी करावयाची होती.



# कसें दैव खेळतें

रोहिणीनें कबूल केल्याप्रमाणें सरोजिनी एकटी असतांना तिच्या महालांत विक्रांताला जातां यावें अशी व्यवस्था केली. ज्या वीरानें आपल्या भावाचे प्राण महासंकटांतून वांचवले त्याला पाहावयास ती मोठ्या आनंदानें कबूल झाली. राजवाड्यांत ती असल्यामुळें विक्रांताची भेट एकटी असतांनासुद्धा घ्यावयास तिला भिण्याचें कांहीं कारण नव्हतें. विक्रांत ज्या वेळीं तिच्या महालांत गेला त्या वेळीं ती आपल्या भावाला अरिष्टांतून परमेश्वरानें वाचवावें म्हणून प्रार्थना करीत होती.

**सरोजिनी :**

> **हे प्रभो विभो अगाध किति तव करणी । मन चिंतुनि हो रत चरणीं ॥ ध्रु० ॥ चांदवा नभाचा केला । रविचंद्र लटकती त्याला । जणुं झुंबर सुबक छताला । मग अंथरली ही धरणी ॥ १ ॥ बाहुलीं मनुष्यें केलीं । त्यां अनेक रूपें दिधलीं । परि सूत्रें त्यांचीं सगळीं । नाचविसी हस्तीं धरुनी ॥ २ ॥**

विक्रांताच्या पावलांचा आवाज ऐकतांच सरोजिनी विचाराच्या तंद्रींतून जागी झाली आणि तिनें त्याच्याकडे पाहिलें. पाहातांच तिनें त्याला ओळखलें.

**सरोजिनी :** तुझ्या मुकेपणाला शंभर वर्षं आयुष्य आहे.

**विक्रांत :** छे, पळभरसुद्धा नाहीं.

**सरोजिनी :** म्हणजे ? तुमचं मुकेपण हें सर्व थोतांडच वाटतं ?

**विक्रांत :** तें आपल्या सौंदर्याला विचार. त्यानेंच मला मुका करून इथें आणलं आणि त्यानेंच मला पुन्हा वाचा दिली.

**सरोजिनी :** मला 'अग जाग' म्हणायला तुम्हांला लाज कशी नाहीं वाटत ?

**विक्रांत :** खऱ्या प्रेमाला 'अहो जाहो' हे शब्द कसे कडू वाटतात.

**सरोजिनी :** माझ्यावर प्रेम करण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ?

**विक्रांत :** ज्या दिवशीं ब्रह्मदेवानें तुझी मूर्ति ओतली त्याच दिवशीं तुझ्यावर प्रेम करण्याचा अधिकार त्यानें दरएक मनुष्याला दिला.

**सरोजिनी :** अंतःपुरांत असा पांचटपणा करायला लागलं म्हणजे चतुर्भुज व्हायला उशीर लागत नाहीं.

**विक्रांत :** मला तरी दुसरं काय पाहिजे ? तुझ्याशीं विवाह करून चतुर्भुज व्हावं हीच मनांतली इच्छा.

**सरोजिनी :** हें तुमचं बोलणं मीं मुळींच ऐकून घेतलं नसतं पण स्त्रियांच्या स्वभावाला अनुसरून मी तुम्हांला एक वेळ क्षमा करतें.

**विक्रांत :** माझ्या प्रेमामुळें सध्यां तूं माझं बोलणं नुसतं ऐकून घेतलंस तरी बराच कार्यभाग झाला असं मी समजेन.

**सरोजिनी :** बरं, तुमची इच्छा काय आहे तें तरी कळूं द्या.

**विक्रांत :** मीं आतां सांगितली तीच. प्रेमानें आंधळा होऊन मी तुझ्याकडे आलों आहें, मला पदरांत घे.

**सरोजिनी :** आंधळे होऊनही ह्या अंतःपुरांत जसे नेमके आलांत तसे नेमके त्याच्या बाहेर निघून जा पाहूं.

**विक्रांत :** शरणागताला असं लाथेनें तुडवणं चांगलं का ?

**सरोजिनी :** असा लहान तोंडीं मोठा घास घेणं तरी चांगलं का ? मी राजकन्या आहें. माझी प्राप्ति करून घेण्याच्या मार्गांत तुम्हांला कशाकशा अडचणी येतील ह्याची कल्पना नाहीं वाटतं ?

**विक्रांत :** आहे, तरी पण तुझ्या तोंडून ऐकण्याची इच्छा आहे.

ठाणे.

सरोजिनी : मी सांगूं तुमच्या माझ्या विवाहाला कोणता मोठा अडथळा आहे तो ?

विक्रांत : लवकर सांग कोणता तो.

सरोजिनी : तुमच्या नि माझ्या वैभवामध्यें जें अंतर आहे तो.

विक्रांत : गुणग्राहक राजकन्या सरोजिनी हिनें हा आक्षेप आणला असं कुणाला सांगितलं तर त्याला तें खोटंच वाटेल.

सरोजिनी : तुमचं म्हणणं खरं आहे.

विक्रांत : आशेला थोडी तरी जागा राहिली आहेसं दिसतं.

सरोजिनी : तुम्ही ज्या अर्थीं माझ्या प्राप्तीकरतां इतके श्रम घेतले आहेत त्या अर्थीं मीं जर एखादा पण लावला तर तो तुम्हांला अमान्य होईलसं वाटत नाहीं.

विक्रांत : तुझी प्राप्ति जर इतक्या सोप्या तऱ्हेनें होईल तर आणखी काय पाहिजे ?

सरोजिनी : तुम्हांला वाटतो तितका सोपा नाहीं तो पण.

विक्रांत : तुझी प्राप्ति शिवायकरून ' कठीण ' ' दुष्कर ' हे शब्द माझ्या स्वप्नांतही आले नाहींत.

सरोजिनी : तुम्ही ओळखाल का माझा पण कोणता तो ?

विक्रांत : जानकीप्रमाणें एखादी जड वस्तु उचलण्याचा, कीं सत्यभामेप्रमाणें वृषभांना जिंकण्याचा ? ऐरावताची धुंदी उतरण्याचा, कीं भुकेलेल्या वाघाच्या तोंडांत हात घालण्याचा ?

सरोजिनी : ह्या गोष्टी नुसत्या बाहुबलानें करतां येतील. ह्यापेक्षां निराळं एखादं काम नाहीं का ?

विक्रांत : मला तर्क करतां येत नाहीं. तूंच सांग तुझा पण काय आहे तो.

सरोजिनी : वारुणी तुम्ही जाणत असालच.

विक्रांत : हो, हो, हें काय विचारतेस ?

सरोजिनी : तिनें माझ्या दादाला घेरलं आहे, तिच्यापासून त्याला सोडवा.

विक्रांत : ही गोष्ट सोप्यापैकीं नाहीं. ह्यांत विघ्नं किती येतील ह्याची तुला कल्पना तरी आहे का ? हें मुक्याचं सोंग मला घ्यावं लागल्यामुळें दोन उपदेशाच्या गोष्टी सांगूं म्हटलं तर तेंही शक्य नाहीं.

सरोजिनी : हें साधण्याजोगं नसलं तर तुम्हांला दुसरा मार्ग मोकळा आहेच.

विक्रांत : तो कोणता ?

सरोजिनी : माझा नाद समूळ सोडून देणं.

विक्रांत : शरच्चंद्र राजाला मदिरेपासून परावृत्त करण्याचा विडा मी उचलतों. जर ह्यांत मला यश आलं तर तूं आपलं वचन पूर्ण करशील ना ?

सरोजिनी : तें मजकडे लागलं.

विक्रांत : विक्रांत राजा तुला मागणी घालणार आहे त्याचं कसं काय ?

सरोजिनी : त्याची भीति सोडून द्या. बरं, किती दिवसांत हा पण जिंकायचा हें समजलं का ?

विक्रांत : किती दिवसांत ?

सरोजिनी : विक्रांत राजाची मागणी येण्यापूर्वी.

विक्रांत : तुझी आज्ञा मला प्रमाण आहे. आतां जातों मी.

विक्रांत गेल्यावर त्याच्या मार्गाकडे पाहात सरोजिनी स्वतःशीं विचार करूं लागली. गोष्ट भलत्याच थराला गेली हें तिच्या लक्षांत आलें तेव्हां तिच्या तोंडून सहज पुढील उद्गार बाहेर पडले—

कसें दैव खेळतें । मनुजाशीं तें ॥ ध्रु० ॥
रूप गुण संपत्ति ऐशी । योजि दीनजनीं कशी ।
क्रौर्यराशि ज्ञानवंता गमे तें ॥ १ ॥

ज्या खासगी दरबाराला वीणारव ऊर्फ विक्रांत व प्रतोद ह्यांना बोलावणें आलें होतें तो दरबार भरला. त्या दरबारांत शरच्चंद्र, विकंठ, विक्रांत, प्रतोद आणि केयूर ऊर्फ मयूर एवढेच हजर होते. त्यांच्यापुढें वारांगना नृत्य करीत होत्या. शरच्चंद्रावर संकट आलें होतें आणि मुक्या वीराच्या पराक्रमामुळें त्यांतून राजाची मुक्तता झाली ही बातमी जेव्हां पसरली तेव्हां राजाच्या सुटकेबद्दल आनंद प्रदर्शित करण्यासाठीं नागरिकांनीं गुढ्यातोरणें उभीं केलीं आणि मोठा उत्सव केला. दरबारांतील नृत्य पुरें करून वारांगना

निघून गेल्यावर विकंठानें ‘ अशा महोत्सवाच्या वेळीं एका वस्तूची फार आठवण येते, तिजवांचून सर्व शून्य वाटत आहे ’ अशा शब्दांत आपलें पिल्लू सोडलें. त्याला आठवण होत होती ती मदिरेची. मदिरेचें नांवही ऐकावयास राजा तयार होईना, तेव्हां विकंठ म्हणाला, “ कालचा प्रसंग ह्या मदिरेमुळें आला असं का आपणाला वाटतं ? ज्या वेळीं ज्या गोष्टी होणार त्या कधीं चुकायच्या नाहींत. ” राजाला हें तत्त्वज्ञान पटेना. मद्य हें समुद्रमंथनापासून निघालेलें एक रत्न आहे, अशी दुसरी कृप्ति विकंठानें लढवली तिची शरच्चंद्रानें ‘ चाबकालाही चौदावं रत्न मानलं आहे ’ ह्या शब्दांनीं वासलात लावली. त्यानें मदिरेला स्पर्शही न करण्याचें वचन राणीला दिलें होतें त्याची त्याला आठवण होती आणि विकंठालाही त्यानें आपला निश्चय कायम असल्याचें सांगितलें. ह्यावर विकंठानें असा युक्तिवाद केला कीं मद्यासारखें आसव एकदम सोडूं नये कारण तसें केल्यास अपाय होतो, म्हणून मदिरा दररोज थोडी थोडी कमी करीत शेवटीं तिला अजिबात फाटा द्यावा. क्रमाक्रमानें शरच्चंद्राची मदिरेपासून पूर्ण मुक्तता करण्याची जबाबदारी विकंठानें घेतली. ही विचारसरणी राजाला पटली कारण त्याचें मनच एकवार तरी मद्याचें दर्शन घ्यावयास उतावीळ झालें होतें. विकंठाला यश आलें आणि राजाला घेऊन तो मदिरामंदिरांत गेला. त्याच्या बरोबर विक्रांतही गेला.

आतां प्रतोदाला केयूराचें बहिरेपण खरें आहे कीं ढोंग आहे ह्याची परीक्षा घेण्याची संधि मिळाली. प्रतोदानें खिशांतून एक कागद काढला आणि वाचावयास सुरुवात केली. ‘ हें नगर फार विस्तीर्ण असूनही त्याचा बंदोबस्त फार उत्तम आहे, शहरासभोवतीं

बळकट तट आहे.' केयूराचें लक्ष आपल्या वाचनाकडे आहे हें प्रतोदाच्या लक्षांत आलें तेव्हां त्यानें आवाज जरा खालावला आणि वाचन चालू केलें. 'शहराच्या भोंवतीं अफाट समुद्राप्रमाणें एक खंदक पसरला आहे.' प्रतोदानें आणखी आवाज खालावला तेव्हां केयूर त्याच्या अगदीं जवळ आला. प्रतोद पुढें वाचूं लागला, 'पण इतक्याही बंदोबस्तांतून न कळत आंत येण्यासारखें आहे.' नंतर एकदम प्रतोद ओरडला, 'अबबब, हा केवढा तरी सर्प!'

केयूर : कुठें आहे? कुठें आहे तो?

प्रतोद : आतां हें ढोंग चालायचं नाहीं. जर का आपला बहिरेपणा मजपाशीं चालू ठेवाल तर तुम्ही खरेच बहिरे बनून जाल अशी ओरड मी राजवाड्यांत करीन.


केयूर : मी पायां पडतों. असं कांहीं करूं नका.

प्रतोद : मग आपलं खरं स्वरूप प्रकट करा.

केयूर : ऐका तर. अंगपूरचं राज्य तुम्हांला ठाऊक असेलच. तेथचा मी राजा. माझं नांव केयूर.

प्रतोद : बहिऱ्या महाराजांना माझा प्रणाम.

केयूरानें आपलें सर्व कारस्थान प्रतोदाला सांगितलें आणि त्याला आपल्या कटांत सामील व्हावयास सुचविलें. प्रतोदाजवळें परवाना असल्यामुळें नगराबाहेर आपले निरोप पाठवावयास त्याचा उपयोग करून घेण्याचा केयूराचा हेतु होता. प्रतोदानें तें एकदम मान्य केलें, कारण तसें केल्यानें केयूराचें सर्व कारस्थान त्याला कळण्याजोगें होतें. 'मी वीणारवाचा पक्का हाडवैरी आहें, त्यानें माझं सर्वस्वी नुकसान केलं आहे, म्हणून मी त्याच्या कच्छपीं राहूसारखा लागलों आहें. त्याचा प्राण घेणं हें माझं उद्दिष्ट आहे.' अशी बतावणी करून प्रतोदानें केयूराचा पूर्ण विश्वास संपादन केला



एकदम प्रतोद ओरडला, ' अबबब, हा केवढा तरी सर्प ! '

विकंठालाही आपल्या कारस्थानांत घेतलें पाहिजे असें केयूर प्रतोदास सांगतो तोंच हातांत सुरई घेऊन विकंठ त्या ठिकाणीं आला.

मदिरामंदिरांत गेल्यावर राजा यथेच्छ दारू प्याला व धुंदींत त्यानें यशोधनाचें रिकामें झालेलें प्रधानपद विकंठाला दिलें. ह्या नेमणुकीची बातमी प्रतोद व केयूर ह्यांना देण्यासाठीं तो तेथें आला. आल्याबरोबर त्याच्या नजरेस आलें कीं केयूर कांहीं खरोखरचा बहिरा नाहीं. त्यानें आपल्याला मिळालेल्या अधिकारपदाची बातमी त्यांना ताबडतोब दिली. 'ह्यापेक्षांही मोठी जागा म्हणजे मांडलिक राजाची गादीच मिळाल्यास ती तुम्ही स्वीकारणार नाहीं का?' असा प्रतोदानें त्याला प्रश्न केला. ह्या प्रश्नानें विकंठाला बुचकळ्यांत टाकलें. त्याचें स्पष्टीकरण करतांना प्रतोदानें केयूराचें खरें स्वरूप आणि कारस्थान ह्यांची पूर्ण माहिती करून दिली.

**विकंठ :** आतां माझा संशय दूर झाला. केयूरमहाराजांना प्रणाम. आपल्या कारस्थानांत मी सामील व्हायला तयार आहें. माझी मदत आपणाला कोणत्या गोष्टींत पाहिजे?

**केयूर :** मद्यांशीं आम्ही तुमच्या सुरापानासंबंधीं बोलत होतों.

**विकंठ :** मी आड उभा राहून तें ऐकत होतों.

**केयूर :** त्यासंबंधींच तुमचं साहाय्य पाहिजे.

**विकंठ :** सुरा पाहिजे असेल...

**केयूर :** ती मला नको, राजालाच नेऊन द्या. तुमच्या राजाला ती अधिकाधिक द्यायची आणि दारूच्या धुंदींत तो असतांना त्याच्यापासून आपणाला हवे असलेले परवाने घ्यायचे, हेंच साहाय्य तुमच्याकडून पाहिजे.

**विकंठ :** तें लागलं माझ्याकडे. आतां मी सर्वस्वी आपला झालों आहें. हेंच काय, आपण सांगाल तें काम करायला मी आतां तयार आहें.



# सहज कशी खेळविते ललना

विक्रांत राजवाड्यांत वाटेल तिकडे फिरावयास मोकळा होता, त्यामुळें सरोजिनीला तो वारंवार दिसत असे. जाहीरपणें तो मुका होता आणि त्याचें मुकेपण खोटें असल्याचें सरोजिनीला माहीत होतें तरी तिनें त्याबद्दल कोणाजवळ अवाक्षर काढलें नव्हतें. दिवसेंदिवस तिचें मन विक्रांताकडे अधिकाधिक ओढलें जात होतें. एक दिवस तिचा धाकटा भाऊ कुमार तिच्याकडे मोठमोठ्यानें हसत आला. त्याच्या हसण्याचें कारण कांहीं तरी क्षुल्लक असणार असेंच प्रथम सरोजिनीला वाटलें. म्हणून तिनें त्याची चेष्टा करावयास सुरुवात केली आणि हसत हसतच त्याच्याशीं ती बोलत होती.

**कुमार :** तूं हसते आहेस, हस बापडी. मघाशीं मी बागेंत कसा गेलों, तिथें कुणाला पाहिलं, मग मला कसं हसूं लोटलं, वीणारवांची कशी चेष्टा चालली होती ...

**सरोजिनी :** कुमारा, वीणारवांचंच नांव घेतलंस ना ?

**कुमार :** आतां कशाला विचारतेस ? आणखी हस ना.

**सरोजिनी :** असं काय करतोस रे ? सांग सगळं.

**कुमार :** सांगतों, पण एका अटीवर हो !

**सरोजिनी :** कोणती अट ?

**कुमार :** तूं आमच्याशीं अलीकडे नीट बोलत नाहींस, मला जवळ घेत नाहींस, आमच्या खेळांत राक्षसानें चोरलेली राणी होत नाहींस...

**सरोजिनी :** मग तुझं म्हणणं काय ?

**कुमार :** म्हणणं इतकंच कीं मी ही गोष्ट सांगितल्यावर माझा एक मुका घे·

**सरोजिनी :** नंतर कशाला ? आधींच घेतें.

**कुमार :** सांगतों ऐक. मी सकाळींच बागेंत गेलों तेव्हां एका गुंफेखालीं आपले नवीन सेवक विनोद नाहींत का, ते वीणारवांसमोर प्रणाम करीत आहेत असं दिसलं, जसा कांहीं एखादा मंत्री महाराजांसमोर सकाळचा प्रणामच करीत आहे. ह्या थट्टेबद्दल तिथल्या तिथेंच त्यांचा मी समाचार घेणार होतों पण मला हसूं इतकं कोसळलं कीं राग जागच्या जागीं राहून तुला सांगायला धावत आलों.

**सरोजिनी :** वीणारव कांहीं बोलले नाहींत का ?

**कुमार :** मुक्याला बोलतां येत नाहीं हें मला कळतं हो !


**सरोजिनी :** इतकं तुझं ज्ञान वाढलं आहे तर ? ही गोष्ट कुणापाशीं सांगितली नाहींस ना ?

**कुमार :** तुला सांगायच्यासाठीं धावत इकडे आलों. दुसऱ्या कुणाला सांगायची ?

**सरोजिनी :** हें दुसरं बक्षीस घे तुला. ( आणखी मुका घेते. ) ही गोष्ट कुणापाशीं सांगूं नकोस हो.

**कुमार :** आतां ही माझ्या ध्यानांतही राहायची नाहीं.

काठीचा घोडा उडवीत कुमार निघून गेल्यावर सरोजिनी विचार करूं लागली. वीणारव विद्वान्, रसिक व सुज्ञ होता ह्याबद्दल तिची आधींच खात्री झालेली होती. कुमारानें सांगितलेल्या हकिकतीवरून वीणारव वैभवशाली असावेत असेंही तिला वाटूं लागलें. ते तसे असल्यास तिला त्यांच्याशीं विवाह करावयास कोणतीही हरकत वाटण्याचें कारण नव्हतें. एक एक घटना अशाच




कुमार : सांगतों, पण एका अटीवर:हो !

घडत जात होत्या कीं त्यांच्यापुढें सरोजिनीचा प्रतिकार टिकूं शकला नाहीं.

प्रतोदाला यशोधनाकडून वेत्रिका अजून अविवाहित आहे असें कळलें तेव्हां त्याला आनंद झाला आणि हुरूपही आला. कोणाशीं तरी वेत्रिकेचें लग्न करून द्यावयास तिचा बाप धडपडत होता. तिचें मन वळविण्याचा प्रयत्न मी करतों असें जेव्हां प्रतोदानें त्याला सांगितलें तेव्हां त्याला थोडीशी आशा वाटली. प्रतोदाची भेट घ्यावयास वेत्रिका तयार आहे कीं नाहीं हें यशोधनानें आधीं अजमावून पाहिलें. ती तयार आहे असें आढळून आलें तेव्हांच त्यानें प्रतोदाला तिच्या भेटीस जाऊं दिलें इतकेंच नव्हे तर ‘ ईश्वर तुम्हांला यश देवो ’ असा आशीर्वाद दिला. यशोधनाची दृष्टि वयपरत्वें क्षीण झाली असल्यामुळें विनोद आणि प्रतोद एकच हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं.

प्रतोदानें वेत्रिकेची भेट घेतली त्या वेळीं ती त्याच्याकडे पाठ करून बसली होती. पण तिच्या पुढ्यांत आरसा होता त्यांत तिचें प्रतिबिंब पडलें होतें तें त्याला दिसत होतें. तो तिच्याशीं सलगीची भाषा बोलूं लागला तेव्हां ती म्हणाली, “ मी सगळ्या पुरुषजातीचा द्वेष करतें. ” प्रतोदानें प्रत्युत्तर केलें, “ मी साऱ्या मनुष्यजातीचा द्वेष करतों. ” पुरुषांचा द्वेष करण्याचें कारण प्रतोदानें विचारलें तेव्हां पूर्वींची प्रतोदाची व तिची प्रेमकथा तिनें सांगितली. प्रतोदानेंही आपल्या लहानपणीं असाच प्रकार घडला असें तिला उत्तर दिलें आणि ओघाओघानें आपलें नांव ‘ प्रतोद ’ असल्याचें सांगितलें. एका वेळीं हें नांव आपल्याला फार आवडत होतें कारण ज्याच्यावर आपलें प्रेम होतें त्याचें हेंच नांव होतें पण आतां मात्र म्हणजे त्या

कुमारानें फसगत केल्यामुळें तें अगदीं नावडतें झालें आहें असें वेत्रिका म्हणाली.

प्रतोद : एवढंच ना ? तुझा माझा विवाह झाला म्हणजे तुझ्याऐवजीं माझंच नांव बदलून टाकूं. तूं आपल्या पहिल्या प्रियकराचा द्वेष करतेस हें ऐकून तुझी मागणी मी दुप्पट उत्साहानें करतों.

वेत्रिका : तुम्हांला निरुत्साह करण्याकरतांच कां होईना, मी तुम्हांला निक्षून सांगतें कीं मी मोठ्या प्रेमानें नि आदरानें त्यालाच वरीन.

प्रतोद : तूं काय म्हणतेस ह्याचा पूर्ण विचार कर.

वेत्रिका : चांगला विचार केला आहे.

प्रतोद : मग नीट पाहा माझ्याकडे.

वेत्रिकेनें निरखून पाहातांच प्रतोदाला ओळखलें आणि तिचें बोलणें एकदम बंद झालें.

प्रतोद : प्रथम तुझ्या पित्याकडे जाऊन त्यांनीं मला दिलेला आशीर्वाद फळाला आल्याची बातमी कळवूं.

वेत्रिका : प्रथम त्या मेल्या मयूराला त्याच्या उद्दामपणाबद्दल शासन केलं पाहिजे. मलां तो काय काय बोलला हें जर आपणाला कळलं असतं, तर मी सांगण्याच्या अगोदर आपणच त्याचं पारिपत्य केलं असतं.

प्रतोद : मला थोडीशी हकीकत तुक्की तुझ्या पित्याकडून कळली. त्या प्रकरणाचा आतां आपण जरूर विचार करूं.

विक्रांतानें मुक्याचें सोंग घेतलेलें असल्यामुळें त्याला सर्व कांहीं गुपचुप करावें लागत होतें आणि ह्या कामीं त्याची सर्व भिस्त एकट्या प्रतोदावर होती. रोहिणीजवळसुद्धा बोलावयास त्याला फारशी संधि मिळूं शकत नव्हती; कारण राणीला एकान्त अतिशय दुर्लभ असतो आणि विक्रांताचें मुक्याचें सोंग तिच्यामुळें उघडकीस येतां कामा नये हें तिला चांगलेंच पटलेलें होतें.

विकंठ रोज शरच्चंद्राला दारू पाजण्यासाठीं मदिरामंदिरांत नेई पण दारूचा पेला तो तोंडाला लावणार इतक्यांत प्रतोदाकरवीं शत्रूंच्या आक्रमणाची बातमी विक्रांत देत असे आणि ती बातमी ऐकतांच दारूचा पेला तसाच टाकून शरच्चंद्र सैन्याच्या तयारीला लागे. ह्या बातम्या खऱ्या वाटण्याकरतां विक्रांताला आपली थोडीशी फौज शरच्चंद्राच्या राज्याच्या सीमेवर खेळवीत ठेवावी लागे. असे कांहीं दिवस गेल्यामुळें शरच्चंद्राची मद्यावरची आसक्ति कमी कमी होत गेली. केयूर व विकंठ ह्यांना हें अर्थात् पसंत नव्हतें. त्यांना आतां घाई झाली होती, कारण शरच्चंद्राची मद्याची आवड पार नाहींशी होण्याचा संभव त्यांना दिसूं लागला. पांच दिवसांत केयूराचें सैन्य शरच्चंद्राच्या राजधानींत घुसवून छापा घालावयाचा व शहर हस्तगत करावयाचें असें कारस्थान त्यांनीं रचलें आणि तें सैन्य बिनबोभाट व प्रतिकार न होतां शहरांत यावें म्हणून शरच्चंद्राला यथेच्छ दारू पाजून अवश्य ते परवाने मिळविण्याचें काम विकंठाकडे सोपवण्यांत आलें. त्यांच्याच गोटांत असणाऱ्या प्रतोदास ही माहिती असल्यामुळें त्यानें ती विक्रांताच्या कानांवर घातली.

ह्या कामाकरतां प्रतोद ज्या वेळीं विक्रांतास भेटण्यासाठीं आला त्या वेळीं सरोजिनीच्या पणामुळें आपणास हा सगळा उद्योग करावा लागतो ह्या घटनेचा तो विचार करीत होता.

विक्रांत : सहज कशी खेळविते ललना ॥ ध्रु० ॥
रमणी लोचन तेंवि फिरें मी । मी तेवीं मम सेना ॥ १
या विश्वाचा स्त्रीलोचनयुगचालक मेरु असेना ॥ २ ॥

कां प्रतोदा, आज कांहीं खास खबर आहे कीं काय ?

प्रतोद : विकंठानें वर्दी द्यायला आज येऊं नको असं मला बजावून सांगितलं आहे.

विक्रांत : ठीक आहे. गेल्या पंधरा दिवसांत शरच्चंद्राची सुरेखची भक्ति किती उडाली पाहिलीस ना ? आतां त्याची जी थोडीबहुत वासना राहिली असेल ती केयूरानें केलेला विश्वासघात आणि विकंठाचा राजद्रोह उघडकीला येतांच नाहींशी होईल. प्रतोदा, आतां असं कर. केयूराच्या सेनाध्यक्षाला त्याचं आज्ञापत्र देण्यापूर्वी आपल्या सेनाध्यक्षाला ही वर्दी पोचव. शत्रुसैन्याचा बीमोड करायला संख्येनें आणि सामर्थ्यानें पुरेसं आपलं सैन्य शहराच्या तटाबाहेर ठेवलं पाहिजे.

प्रतोद : जशी आपली आज्ञा. खरोखर आपण जर ह्या शहरीं नसतां तर हें राज्य दुष्ट केयूराच्या स्वाधीन झालं असतं.

विक्रांत : बिचाऱ्या शरच्चंद्राला ह्याचा मागमूसही नाहीं. पण प्रतोदा, तो राजाच आला वाटतं. त्यानें तुला नि मला बोलतांना पाहातां कामा नये. जा तूं आतां ; आणि मलाही ईश्वरदत्त वाक्शक्तीला आवरून धरलं पाहिजे.

बाजूच्या दरवाजानें प्रतोद गेला आणि दुसऱ्या दरवाजानें शरच्चंद्र राजा त्या ठिकाणीं आला. इतकी इमानेंइतबारें सेवा करण्याबद्दल तुला काय बक्षीस पाहिजे असें शरच्चंद्र विचारतो आणि खुणेनें 'आपली सेवा' असें विक्रांत उत्तर देतो, इतक्यांत विकंठ तेथें आला. कांहींही करून आज राजाला दारू पाजलीच पाहिजे असा त्याचा निश्चय होता.

विकंठ : महाराज, आज मी मोठ्या आनंदाची एक बातमी कळवायला आलों आहें. बक्षीस मात्र मी मागेन तें दिलं पाहिजे.

शरच्चंद्र : ठीक आहे. पण ती बातमी कोणती ?

विकंठ : शत्रूच्या एका मोठ्या तुकडीचा आपल्या सैन्यानें आज पराभव केला.

शरच्चंद्र : विनाकारण आमच्या मुलखाला उध्वस्त करणाऱ्या शत्रूचं नांव काय ?

विकंठ : अंगदेशाचा राजा केयूर.

शरच्चंद्र : तर मग केयूराला चांगलीच ठोकर बसली म्हणायची.

विकंठ : ह्या बातमीबद्दल आपण बक्षीस देण्याचं कबूल केलं आहे ना ?

शरच्चंद्र : काय पाहिजे तें माग. आज माझं मन फारच प्रसन्न आहे.

विकंठ : आपणाकरतां उंची तऱ्हेची सुरा मीं खास तयार केली आहे. तिचा आपण आस्वाद घ्यावा. अशी सुरा थोड्याच प्रमाणांत घेववते आणि तिच्या गुणामुळें आपली सवयही कमी होईल.

शरच्चंद्र : मला आतां सुरेबद्दल थोडीही लालसा राहिली नाहीं.

विकंठ : मुद्दाम आपणाकरतां ही सुरा मीं तयार केली ती निरर्थकच म्हणायची !

शरच्चंद्र : तुझा आग्रहच असेल तर अशा आनंदाच्या वेळीं मी तिचा आदर करायला अनमान करीत नाहीं. पुन्हा मात्र तयार करण्याचे श्रम घेऊं नकोस.

विकंठ : आतां कसं माझ्या मनाला समाधान वाटतं.

एकाच पेल्यानें कैफ चढावा इतकी जलाल सुरा विकंठानें बनवली होती आणि त्याप्रमाणें एकाच पेल्यानें शरच्चंद्र बेफाम झाला. नंतर त्यानें आणखी मागून घेतली. राजाची ही अवस्था पाहून विकंठानें आपलें घोडें एकदम पुढें ढकललें. " सरकार, दरबारच्या एका कागदावर अजून सही करायची आहे " असें म्हणून विकंठानें एक कोरा कागद पुढें केला आणि " हजारों कागद आणलेस तरी मी तयार आहें, सह्याच सह्या करून टाकतों " असें म्हणत शरच्चंद्रानें त्यावर सही केली.

हा प्रकार चाललेला असतांना रोहिणी तेथें आली आणि चकित झाली. शरच्चंद्र तर आतां जमिनीवर नव्हताच म्हटलें तरी चालेल. राणीला पाहातांच " प्रिये, तूंही थोडी मदिरा घे "

असें तो म्हणाला. राजा अधिकाधिकच बहकूं लागला. तो स्वतः राणीला "प्रिये, प्रिये" अशी हाक मारीत होता पण ते शब्द विक्रांत बोलतो आहे असा त्याला भास होऊं लागला. तो संतापला आणि आपल्या पत्नीला नाहीं नाहीं ते अपशब्द बोलूं लागला. विकंठाला कल्पना नव्हती इतकें यश त्याला मिळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. राणीला तेथून घालवून देऊन शरच्चंद्र विक्रांताकडे वळला आणि त्याला "निघून जा माझ्या दृष्टीपुढून" असें म्हणाला. विक्रांत निघून गेला तेव्हां त्याचा कांटा कायमचा काढण्याची संधि साधण्याचा डाव विकंठानें टाकला.

विकंठ : सरकार, त्या मुक्याला काय शिक्षा द्यायची ?

शरच्चंद्र : तुला वाटेल ती दे. त्याला मी आश्रय देऊन चुकलों आहें तेव्हां त्याचा प्राण घेतां येत नाहीं. हद्दपार करून टाक म्हणजे झालं.

विकंठ : ही शिक्षा थोडीशी कडकच होते म्हणायची.

शरच्चंद्र : तूं जर अशी गय करूं लागशील तर तुलाही त्याच्याबरोबर जावं लागेल.

विकंठ : तर मग सरकारनीं ह्या कागदावर सही करावी.

एका कोऱ्या कागदावर राजाची सही घेऊन मोठ्या विजयोत्साहानें विकंठ निघून गेला.

प्रतोद व वेत्रिका ह्या दोघांनीं मिळून केयूरास शासन करण्यासाठीं एक जाळें तयार केलें. वेत्रिकेच्या सौंदर्यानें केयूर मोहित झाला होता तेव्हां तिनें जर अपरात्रीं त्याला बोलावलें तर तो एकटा तिच्या घरीं येईल ही खात्री होती. वेत्रिकेनें त्याला देण्याकरतां म्हणून एक पत्र प्रतोदाजवळ दिलें आणि तें घेऊन केयूराच्या निवासस्थानीं प्रतोद हजर झाला. तोंपर्यंत केयूर घरीं आला नव्हता

कारण विकंठानें काम फत्ते केलें कीं नाहीं हें समजण्याची त्याला अधिक उत्कंठा होती.

वेत्रिकेचें कपटपत्र पुन्हा एकदा वाचून पाहाण्याचा विचार प्रतोदाच्या मनांत आला तोंच केयूर त्या ठिकाणीं आला आणि आपलें काम फत्ते झालें अशी बातमी त्यानें प्रतोदाला दिली; शिवाय त्या मुक्यालाही गुप्तपणें हद्दपारीची शिक्षा झाली आहे अशी आणखी आनंदाची बातमी दिली आणि हद्दपारीचा हुकूम भरावयास सांगितलें. हें ऐकून घेतल्यावर वेत्रिकेचें पत्र प्रतोदानें केयूराच्या हातीं दिलें.

प्रतोद : आतां एका हुजऱ्यानें हें पत्र आणून दिलं.

केयूर : हें त्या यशोधनाच्या सुंदर पोरीचं पत्र. मी मोठ्यानें वाचतों, ऐका. 'आपणास मीं कोप दाखवला पण तो अगदीं खरा नव्हता. तरी तो विसरून एकवार दर्शन द्याल अशी आशा आहे. आज रात्रीं स्मशानाच्या पूर्व भागास मी कांहीं नोकर हजर ठेवतें. आपण मध्यरात्रीच्या सुमारास तेथें एकट्यानें यावें. ते प्रथम आपणास धाक दाखवतील, आपल्या अंगावर हातदेखील टाकतील. पण हें सर्व आपल्या परीक्षेकरतां. खरें प्रेम अशा संकटांना कधीं भीत नाहीं. आपण त्यांचें वर्तन निमूटपणें—म्हणजे एकही शब्द न उच्चारतां—सहन केल्यावर ते जवळच उभा केलेल्या रथांत आपणास घालून मजकडे आणतील. आपणांस जो शीण झाला असेल तो मी लागलीच घालवण्याचा प्रयत्न करीन. वरील विवाहपद्धति आपणांस जराशी चमत्कारिक वाटेल, पण नाइलाज आहे. ती माझ्या कुळांत परंपरागत असल्यामुळें मला अनुसरली पाहिजे.'

प्रतोद : हें जरा धाडसाचं काम दिसतं आहे. तुम्हांला झेपेलसं दिसत नाहीं. त्या स्मशानांत मी जाऊन बसतों आणि पत्रांत लिहिल्याप्रमाणें करतों. तिच्या मंदिरांत जाईपर्यंत तिलाही हें कपट कळणार नाहीं.

केयूर : छे, छे, अशा कुमारिकेचा विश्वासघात माझ्या हातून कदापि होणार नाहीं.

प्रतोद : ठीक आहे, सुंदर स्त्रिया राजेलोकांनाच मिळायच्या. महाराज, ह्या पत्रावरून मला एक विचार सुचला आहे. त्याप्रमाणें वागल्यास तुम्हांला आणि मला दोघांनाही समाधान वाटेल.

केयूर : काय म्हणणं आहे तुमचं ?

प्रतोद : मला त्या मुक्यावर सूड उगवायचा आहे हें तुम्हांला माहीत आहेच. ह्या हद्दपारीच्या हुकमांत असा मजकूर लिहा कीं स्मशानाच्या पश्चिम भागीं एक मुका मनुष्य उभा असलेला दिसेल, तो मुका आहे कीं नाहीं हें ओळखण्याकरतां त्याला खरपूस मार द्यावा व त्याचा मुकेपणा निश्चित केल्यावर त्याला शहराबाहेर उचलून न्यावं.

केयूर : पण तो मुका रात्रीं तिथें नेमका यावा कसा ?

प्रतोद : तें माझं काम.

केयूर : ठीक आहे तर. चला आपण आपल्या कार्याला लागूं. तुम्हीं म्हटल्याप्रमाणें मजकूर ह्या हद्दपारीच्या हुकमांत लिहून टाका. आतां विलंब मुळींच उपयोगी नाहीं.

प्रतोदानें केयूराचा डाव त्याच्यावरच उलटवला. त्या गांवची तसून् तसू जमीन प्रतोदास माहीत होती. केयूराला तशा प्रकारें माहिती मिळविण्यास फुरसत नव्हती आणि स्मशानाच्या दिशा तर सहजासहजीं कोणाला माहीत होत नाहींत. केयूरास स्मशानांत एकट्यानें जाणें शक्य नव्हतें कारण पश्चिम भाग कोणता हेंही त्याला माहीत असण्याचा संभव नव्हता आणि सगळ्याच माणसांना रात्रीं स्मशानांत एकट्यानें जाण्याइतकें धैर्य नसतें. म्हणून त्यानें प्रतोदाला आपल्या बरोबर यावयास सांगितलें. विक्रांताच्या हद्दपारीच्या हुकमांत जी दिशा लिहिलेली होती त्याच दिशेकडे प्रतोदानें केयूरास नेलें. केयूर साशंक होता पण त्याचा इलाज नव्हता. स्मशानांत वेत्रिकेचे लोक यावयाचे नव्हतेच कारण तिचें पत्र म्हणजे केवळ कपटनाटक होतें. स्मशानांत आले ते फक्त हद्दपारीचा हुकूम बजावण्यासाठीं आलेले सरकारी शिपाई होते. स्मशानांत आल्यावर केयूराच्या मनांत भीति निर्माण करणारें असें

भुताखेतांचें वर्णन प्रतोदानें केलें. थोड्याच वेळांत सरकारी शिपायांची चाहूल लागली आणि प्रतोद निघून गेला. हुकमांत लिहिल्याप्रमाणें शिपायांनीं केयूरास मार दिला आणि तो त्यानें मुळींच न बोलतां सहन केला, तेव्हां तोच तो मुका असला पाहिजे अशी त्यांची खात्री झाली. शिपायांनीं हुकमाप्रमाणें त्याला हद्दपार केलें.



# रम्या शोभते मही

राजानें वीणारवाला म्हणजेच विक्रांताला घालवून दिल्यानंतर, त्यानें प्रथम रोहिणीला तिच्या महालांत पोचविलें. आतां त्याला राजवाडा व राजधानी सोडून जाणें प्राप्त होतें. प्रसंग एकामागून एक इतक्या झपाट्यानें येऊं लागले कीं जें कांहीं करावयाचें तें ताबडतोब करण्याची वेळ आली होती. केयूरास हद्दपार केल्यामुळें त्याचें राजधानींतील कारस्थान संपलें होतें. त्याच्या सैन्याला राजधानींत शिरण्याचा परवाना मिळालेला होता. त्याचा उपयोग शक्य तितक्या त्वरेनें तो करणार हें निश्चित होतें. राजधानींतून निघून जावयाच्या पूर्वीं एकदा सरोजिनीची भेट व्हावी अशी इच्छा विक्रांतानें बोलून दाखवली आणि रोहिणीनें तशी व्यवस्था चटकन केली. राजवाड्याच्या आवारांतील एका बागेंत तो सरोजिनीची वाट पाहात बसला. रोहिणीनें निरोप पाठवल्याबरोबर ती त्याची भेट घ्यावयास बागेंत आली. ती अष्टमीची रात्र होती आणि नुक्ताच चंद्रोदय झाला होता. तिची चाहूल लागली तेव्हां विक्रांतानें झोपेचें सोंग घेतलें आणि तो कारंजाजवळ पडून राहिला. सरोजिनी बागेंत त्याचा शोध काढीत काढीत त्या ठिकाणीं आली आणि तिनें झोपेचें सोंग घेतलेल्या विक्रांताला जागें केलें.

विक्रांत : नृप झालों दैवें तरिही । हें जागृत होणें नाहीं ॥ ध्रु० ॥
या श्वासाचें ताडन लाजवि मलयाचलिच्या वाता ।
कंकणरव हा बंदिजनातें स्तुतिपाठातें गातां ॥ १ ॥
प्रेमभरित या नयनयुगाचें किरणजाल पाहोनी ।
जनप्रबोधन नित्य कृत्य हें देइल रवि सोडोनी ॥ २ ॥

पण इतकं गोड जागं होणंही शेवटचं आणि ही झोपही शेवटचीच.

सरोजिनी : पण असे खिन्न विचार आजच काय म्हणून ? भोवतालीं पाहिलंत का ? आनंदी आनंद चालला आहे !

तरु विधुसी पवनयोगें नमीती फिरूनही ॥ ध्रु० ॥
चिरनिद्रेमधुनि जागी रमणकरें जाहली ।
करि हास्या योगकालीं रम्या शोभते मही ॥ १ ॥

विक्रांत : तुझ्याजवळ केलेल्या पणांत यश मिळण्याची मला मुळींच आशा नाहीं म्हणून हे विचार येतात. सरोजिनी, ह्या ठिकाणीं मी बसलों तो तुझी शेवटची भेट घेण्याकरतां.

सरोजिनी : शेवटची भेट ? अशा वेळीं तुम्ही आम्हांला सोडूं नका. पणासंबंधीं आपणाला मुळींच चिंता करायला नको. आपणाला मीच प्रतिज्ञामुक्त करतें.

विक्रांत : प्रतिज्ञामुक्त ? अशा निंदास्पद रीतीनें पणांतून मोकळा होऊन हें काळं तोंड दाखवूं कुठें ? मीं संकटांना जुमानलं नसतं आणि माझा प्रयत्न पुढें चालू ठेवला असता, पण तूं जी मुदत दिली होतीस ती उद्यां संपणार. विक्रांत राजानें आपला वकील तुला मागणी घालण्याकरतां पाठवला आहे असं समजतं. तो बहुतकरून उद्यांच येऊन पोचेल.

सरोजिनी : दैव आपल्या पाठीस हात धुवून लागलं आहे. मी आपणांला पणांतून मोकळे करीत असूनही आपण आपला आग्रह सोडीत नाहीं ; तेव्हां मीही एक प्रतिज्ञा करतें.

पण तुमचा पाहुनीयां स्फूर्ति घडे अंतरीं ।
पाहूं ह्या पण यशातें पावे कां हा तरी ॥ ध्रु० ॥
अर्पिन कधि काळीं ह्या देहा । तुम्हांप्रती तरि
इतरां नच हा । आला नृप जरि पुढति महा ।
मन न ढळे तिळभरी ॥ १ ॥

विक्रांत : शाबास, सरोजिनी. तूं ह्या वीणारवाला मान खालीं घालायला लावलीस. मी आतां तुझा निरोप घेतों तो पुष्कळशा समाधानानं घेतों, कारण विवाहापासून होणाऱ्या सुखाच्या खालोखाल सुख, आपणावर निःसीम प्रेम करणारं एक तरी मनुष्य आहे ह्या विचारापासून होत असतं.

विक्रांत बागेंतून गेला तो सरळ नगराबाहेर आपल्या फौजेच्या तळाकडे गेला. दुसऱ्या दिवशीं केयूराच्या सैन्याच्या हालचालींची बातमी त्यानें काढली तेव्हां त्या रात्रीं आपल्या सैन्यासह केयूर शरच्चंद्राच्या राजधानींत शिरणार आणि शहर हस्तगत करणार हें त्याला समजलें. आपल्या सेनापतीला जरूर ते हुकूम देऊन, विक्रांतानें वकिलाचा वेष घेतला, भली मोठी दाढी लावली, लांबलचक अंगरखा घातला आणि आगाऊ वर्दी न देतां प्रतोदाजवळ असलेल्या हेराच्या परवान्याच्या जोरावर रात्र सुरू झाल्यानंतर नगरांत पुन्हा प्रवेश केला. शरच्चंद्र राजाला आगाऊ वर्दी न देण्याचा उद्देश हा कीं विक्रांताच्या हालचालींची बातमी केयूरास मिळूं नये. हा उद्देश बहुतांशीं सफल झाला.

नगरांत आल्यानंतर मात्र त्याला शरच्चंद्राकडे वर्दी पाठवणें अवश्य होतें आणि प्रतोदाकरवीं ती त्यानें पाठविली. विक्रांत सार्वभौम राजा, त्याच्या वकिलाचें आदरातिथ्य करण्यांत कसूर होतां कामा नये अशी शरच्चंद्राला आस्था असल्यामुळें त्यानें लगेच नागरिकांना आपलीं घरें शृंगारण्याचा आणि दीपोत्सव करण्याचा हुकूम सोडला. दारूचें व्यसन लागेपर्यंत शरच्चंद्र अत्यंत लोकप्रिय होता आणि ह्या व्यसनाची झळही सर्वसाधारण नागरिकांना लागलेली नव्हती. ह्यामुळें शरच्चंद्राचा हुकूम सुटतांच नागरिकांनीं नव्या नवरीप्रमाणें सर्व नगरी शृंगारून तयार केली. नागरिकांनीं केलेलें हें

विक्रांताच्या वकिलाचें आदरातिथ्य शरच्चंद्रानें त्या वकिलाला मोठ्या अभिमानानें दाखवलें. इतक्या तांतडीनें, आगाऊ सूचना न पाठवतां, इतक्या वृद्ध वकिलाला विक्रांतमहाराजांनीं पाठविण्याचें कारण शरच्चंद्रानें विचारलें तेव्हां सरोजिनीला मागणी घालण्याचें काम आपल्यावर सोपवलेलें आहे असा वकिलानें जबाब दिला. शरच्चंद्रानें आपल्या राणीला निरोप पाठवून सरोजिनीला बोलावून घेतलें.

खाजगी दरबारच्या महालांत शरच्चंद्र व वकील बसले आणि त्या महालांत रोहिणी व सरोजिनी आल्या. त्यांच्याबरोबर वेत्रिका व तिची आई प्रमद्वरा ह्याही आल्या. कुमार त्या ठिकाणीं होताच. शरच्चंद्रानें प्रमद्वरेला मोठ्या आदरानें बसावयास सांगितलें कारण यशोधनासंबंधीं त्यानें केलेला अन्याय त्याच्या मनाला खात होता. सरोजिनी त्या ठिकाणीं आली ती नाइलाज म्हणून आली. तिचें हृदय शून्य झालें होतें आणि इंद्रियें जड झालीं होतीं. वेत्रिका तिला धीर देत होती. सरोजिनीचा म्लान चेहेरा पाहून विक्रांत म्हणाला, "आमच्या भावी राणीसाहेबांची प्रकृति आज नीट दिसत नाहीं. ह्या आतांच्या त्रासामुळें जर त्यांना अस्वास्थ्य उत्पन्न झालं असेल तर आपण उद्यां बोलत बसूं." शरच्चंद्राला तसें करण्याची जरूरी वाटली नाहीं आणि विक्रांतानें सरोजिनीला घातलेल्या मागणीबद्दलचें बोलणें चालू झालें.

विक्रांताची तसबीर आपण आणली आहे असें वकिलानें शरच्चंद्राला सांगितलें तेव्हां ती तसबीर दाखवण्याची विनंती शरच्चंद्रानें केली. ती तसबीर पाहिल्यावर शरच्चंद्राला वीणारवाच्या व विक्रांताच्या चेहेऱ्यांतील साम्य दिसलें. सत्याप्रमाणें सौंदर्यही

नेहमीं सारखेंच असतें असें म्हणून त्यानें आपलें समाधान करून घेतलें. ती तसबीर राजानें सरोजिनीला दाखवली. तसबीर पाहून सरोजिनीच्याही लक्षांत तें साम्य आलें. ‘हा चेहेरा दिसतो कोणासारखा बरं ? हा त्यांच्याचसारखा दिसत नाहीं का ? दमयंतीचं सत्त्व पाहाण्याकरतां देवांनीं नलाचं रूप धारण केलं होतं. त्याचप्रमाणें विक्रांतराजा माझं सत्त्व तर पाहात नाहीं ना ?’ असें ती स्वतःशीं म्हणाली. ही तसबीर तुमच्या मनांत कशी काय उतरली, असा प्रश्न राणीनें विचारला त्याचा जबाब “ माझ्या मनांत आतां परपुरुषाला जागा नाहीं ” ह्या शब्दांत सरोजिनीनें दिला. ह्याचा खुलासा करावयास शरच्चंद्रानें सांगितलें तेव्हां मुक्या वीणारवावर सरोजिनीचें प्रेम बसलें आणि तो मुका नव्हता हें त्याला समजलें. आपल्या व्यसनाचे हे परिणाम आहेत हें आतां त्याच्या लक्षांत येऊं लागलें व त्याला दुःख झालें.

**शरच्चंद्र :** सरोजिनी, तूं शहाणी आहेस. तुझ्या अविचारामुळं केवढं संकट ओढवणार आहे पाहिलंस का ? पुन्हा एकदा विचार कर. विक्रांत राजाचा महाप्रताप नि ऐश्वर्य लक्षांत आण. उलटपक्षीं त्या मुक्याचं लघुत्व मनांत आणून त्याला हृदयांतून काढून टाक.

**सरोजिनी :**

अतिगहन मूल हा प्रेमतरु । उन्मूलन याचें केविं करूं ॥ ध्रु० ॥
दृढ पाश सुरेचा तेविंच हा । त्या सुगुणगृहा कैशी विसरूं ॥ १ ॥

**शरच्चंद्र :** ह्या उत्तरानें माझं तोंडच बंद झालं. तर मग ह्याला उपायच नाहीं म्हणायचा ?

**सरोजिनी :** प्रत्येक संकटावर उपाय असतात. पहिला उपाय हा पाहा. वकीलसाहेब, मी आपल्या पायां पडतें. आपल्या शब्दाला विक्रांतमहाराज मान दिल्याशिवाय राहाणार नाहींत, म्हणून विनंती करतें, मला आपली धर्मकन्या समजा.

विक्रांत : नाहीं, मी तसं समजूं शकत नाहीं.

सरोजिनी : नाहीं ? मग हा पाहा माझा दुसरा उपाय.

तिनें कट्यार आपल्या पदराखालीं झाकून आणली होती ती बाहेर काढली.

सरोजिनी : मी संकटाच्या भीतीनें आत्मघात करतें असं नव्हे, तर दादांच्या आणि राज्याच्या हिताकरतां करतें आहें.

शरच्चंद्र : शाबास, ताई. तूं आपल्या निस्सीम प्रेमानें मला खालीं पाहायला लावलंस. ती कट्यार माझ्या हृदयांत खुपस; मींच व्यसनाधीन होऊन हें संकट उभं केलं. आतां जें कांहीं व्हायचं असेल तें होईल. आपण दोघंही खऱ्या योद्ध्याप्रमाणें विक्रांत राजाशीं समर करून एकमेकांच्या बाहुपाशांत प्राण सोडूं. तूं तरी क्षत्रियाचीच कन्या आहेस.

विक्रांत : महाराज, मी अल्पमतीनें एक मार्ग सुचवणार आहें. त्यानें त्या मुक्याला दिलेलं वचन अबाधित राहील नि विक्रांतराजाचा रोषही टळेल.


शरच्चंद्र : असं झालं तर मी आपणांला प्रति ईश्वर समजेन.

राजवाड्यांत हें चालू होतें त्याच वेळीं केयूराचे लोक शहरांत शिरले आणि विकंठाच्या साहाय्यानें शहर जिंकलें असें त्यांना वाटलें. वाटलें म्हणावयाचें कारण असें कीं त्यांच्या पावलावर पाऊल टाकून विक्रांताची फौजही राजधानींत शिरली. केयूर सरळ राजवाड्यांत शिरला आणि शरच्चंद्र वगैरे मंडळी बसली होती त्याच महालांत विकंठासह येऊन थडकला.

केयूर : शरच्चंद्रमहाराज, तुम्ही कृपावंत होऊन ज्याला सेवक म्हणून पदरीं ठेवलं तो बहिरा नव्हता. त्यानें तुमचीं सर्व राज्यकारस्थानं ऐकलीं आणि संधि येतांच हें राज्य पटकावलं. हा सर्व त्या यवन राजाचा प्रताप. यवन राजाचा जयजयकार !

विकंठ : केयूर महाराजांचा जयजयकार !

केयूराचें लक्ष विक्रांताकडे गेलें. त्याची दाढी पाहून ती खेचण्याकरतां केयूर पुढें आला, तोंच प्रतोद कांहीं शिपाई घेऊन



विक्रांत : होय, आपल्या मायभूमीच्या मानेवर सुरी फिरवणाऱ्या अधमा, मीच विक्रांत

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्र. ... दि. ...

त्या महालांत आला. विक्रांतानें दाढी काढून टाकली तेव्हां तो मुका वीणारव असल्याचें सर्वांना दिसून आलें.

प्रतोद : अंगराज, प्रथम गुडघे मोडून नम्रभावानें ह्या विक्रांतमहाराजांना शरण या.

केयूर : कोण, विक्रांत ?

विक्रांत : होय, आपल्या मायभूमीच्या मानेवर सुरी फिरवणाऱ्या अधमा, मीच विक्रांत.

केयूर : तर मग फारच चांगलं झालं. दोनही राज्यं एकदम खालसा करून टाकतों. कोण आहे तिकडे, विकंठ ?

प्रतोद : वळून पाहा एकदा त्या फितुरी माणसाकडे. मागें दोनही हात बांधल्यामुळें स्वारी कशी कमान करण्याच्या बेतांत आली आहे. ह्या वेळीं त्याचा पाठिंबा मिळणार नाहीं, पोटोबा मिळेल.

सरोजिनी : अहा हा माझा प्राणपति ॥ ध्रु० ॥
घना दूर रवि सारुनि जेविं प्रकट करितसे कांति ।
दीन वेष हा टाकुनि दावी निज नृपतेजाप्रती किती ॥ १ ॥

प्रतोदाचे शिपाई केयूर व विकंठ ह्यांना कैद करून घेऊन गेले. विक्रांतानें सार्वभौम राजा ह्या नात्यानें केयूराचें राज्य शरच्चंद्राच्या धाकट्या भावाला दिलें आणि केयूर व विकंठ ह्यांची चौकशी दरबारांत होईल असें जाहीर केलें. यशोधनाची नेमणूक पुन्हा मुख्य प्रधानाच्या जागीं झाली पाहिजे असेंही विक्रांतानेंच शरच्चंद्र राजाला सांगितलें.

शरच्चंद्र : मी ही नेमणूक आनंदानें करतों; पण विक्रांतमहाराज, आपण माझ्या नगरांत दीन वेषानें राहावं ह्याची मला लाज वाटूं लागली आहे.

विक्रांत : त्याबद्दल तुम्ही विषाद मानूं नका. माझ्या ह्या कृतीला कारण तुमची सर्वगुणमंडित बहीण. तिनें लावलेला पण मीं जिंकला असं मला वाटतं.

सरोजिनीच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. विक्रांत, शरच्चंद्र आणि यशोधन नागरिकांमध्यें गेले. नागरिकांची स्थिति अगदीं विचित्र झाली होती. आनंदांत आणि उत्सवांत ते गर्क झाले असतांना एकदम त्यांच्यावर हल्ला झाला. थोड्यांच वेळांत पहिला हल्ला करणारांच्यावर दुसऱ्या फौजेनें हल्ला केला. हा काय प्रकार आहे हें त्यांना समजेना. विक्रांत व शरच्चंद्र ह्यांनीं खरा प्रकार नागरिकांना कळवून शांतता व सुरक्षितता प्रस्थापित केली.

विक्रांत व सरोजिनी ह्यांचा प्रचंड थाटामाटांत विवाह झाला. त्यांच्याबरोबरच प्रतोद व वेत्रिका ह्यांचाही विवाह झाला.

अनुक्रम
नों. दि.
वाचनालय

# वेल्ल, मिस्तर सूत्रधारराव...

" आज नाटक काय करायचं तें सांगा अगोदर. मग पुढची तजवीज. "

श्री. गणेश विष्णु ऊर्फ तात्याबा मुंबईकरविरचित " द्रौपदीवस्त्रहरण " नाटकांत विदूषकानें सूत्रधारास उद्देशून म्हटलेलं हें वाक्य आहे. १८९९ सालीं विदूषकाच्या ह्या विनोदानें प्रेक्षकांत हशाचा एकच कल्लोळ असावा.

आज मात्र नाटकांचा सर्वच सांचा बदललेला दिसतो. रात्रीं ९ वाजल्यापासून उजाडेपर्यंत चालणारीं नाटकं आतां स्मृतिगतच झालीं आहेत. तथापि त्यांतील कांहीं नाटकं रंगभूमीवर आलीं कीं अजूनही गर्दी खेंचतात.

नव्या पिढीला, विशेषत: प्रौढ मुलांना निवडक जुन्या नाटकांचीं संविधानकं आणि त्यांतील नाट्यपूर्ण संवाद ह्यांची ओळख करून देण्याच्या दृष्टीनें ' नाटकांच्या गोष्टी ' ही माला आम्ही प्रकाशित करीत आहों. सुप्रसिद्ध नाट्यरसिक व ' नाटकमंडळींच्या बिऱ्हाडीं ' ह्या पुस्तकाचे कर्ते श्री. पु. रा. लेले हे ही माला गुंफीत असून पुढील ' गोष्टी ' प्रसिद्ध झाल्या आहेत.

## सौभद्र

**कै. अण्णासाहेब किर्लोस्कर**

ह्यांच्या सौभद्र नाटकाची गोष्ट

किंमत आठ आणे

## शारदा

**गोविंद बल्लाळ देवल**

ह्यांच्या शारदा नाटकाची गोष्ट

किंमत आठ आणे

मराठी गद्य व संगीत नाटकांची तोंडओळख करून घेण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक नाट्यरसिकानें ह्या ' गोष्टी ' वाचल्या पाहिजेत.

***********************************************

**केशव भिकाजी ढवळे, मुंबई २**

BVBK-0404495